# वसई विरार शहर महानगरपालिका

# जागतिक पर्यावरण दिन

दि.०५-०६-२०२१



**पृथ्वीला,निसर्गाला तुमच्यासारखेच जगू द्या तिच्यामुळे आपण जिवंत आहोत एवढ भान असू दया......**

**जागतिक पर्यावरण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...**

दरवर्षी **५ जूनला “पर्यावरण दिन”** साजरा करण्यात येतो. जवळपास ५ दशकापासून पर्यावरण दिवस पर्यावरणाच्या संरक्षणासाठी जनजागृती करत आहे. पण यंदा (कोव्हिड-१९) कोरोना विषाणुच्या प्रार्दुभावामुळे देशात सर्वत्र लॉकडाऊन (LOCKDOWN) असल्याने व सार्वजनिक ठिकाणी एकत्र समारंभ करणेस सक्त मनाई असल्याने **५ जून** रोजीचा **“पर्यावरण दिवस”** साजरा करणे शक्य होणार नाही.

➢ **पर्यावरणाच्या दृष्टीने जनजागृती करणेकरिता स्लोगन खालीलप्रमाणे:-**

- “पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागविण्यासाठी खूप काही पुरवते, परंतू प्रत्येक मनुष्याला याचा हाव नसावा.”
- “पृथ्वी ही आपल्या घरासारखी आहे आणि आपण ती स्वच्छ आणि हरित ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, आम्ही त्यास राहण्याचे एक चांगले ठिकाण बनवण्याचे वचन देऊया.”
- “जागतिक पर्यावरण दिन आपल्या वातावरणाविषयी आपण केलेले चुकीचे आणि हे सर्व सुधारण्यासाठी आपण काय करणे आवश्यक आहे याची आठवण करुन देत राहील.”
- “आपल्या आगामी पिढ्यांना एक सुंदर जीवन जगण्यासाठी एक निरोगी आणि आनंदी वातावरण देऊया.”
- “आमच्या ग्रहाचा गजर सुटत आहे, आणि जागृत होण्याची वेळ आली आहे.”

➢ **नागरिकांनी घरात राहुन पर्यावरण दिवस खालीलप्रमाणे साजरा करावा.**”

• शक्य असल्यास यंदा आपल्या घरातच छोटी रोपं लावा.

• वस्तूंचा फेरवापर करण्याबाबत विचार करा आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांनाही यात सहभागी करा.

• पॉलिथिनचा वापर शक्यतो करु नका, त्याऐवजी कापडी पिशव्या वापरा., विजेचा कमीत कमी वापर करा.

• घरातील कोणतीही वस्तू फेकण्याआधी तिचा आणखी कोणत्या प्रकारे वापर होईल का हे पहा. “रस्त्यावर किंवा इतरत्र थुंकू नका आणि इतरांनाही याबाबत सांगा.”, नव्या पिढीला निसर्ग, पर्यावरण, पाणी तसंच वृक्षांचं महत्त्व समजावून सांगा.





## वसई विरार शहर महानगरपालिकेने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केलेल्या उपक्रमाची छायाचित्रे:-







